REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# भारतीय संगीतात ठुमरीचे स्थान



**प्रा. उत्तरा र. तडवी**
**श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट**

## प्रस्तावना :

भारतीय संगीतामध्ये 'ठुमरीला' अतिशय महत्वाचे स्थान आज प्राप्त झाले आहे. परंतु हे स्थान प्राप्त होण्यासाठी अनेक स्थित्यंतरे भारतीय संगीतामध्ये घडून आली, ती म्हणजे वैदिक संगीत, प्रबंधगायन, ख्यालगायन आणि याच्यानंतर उपशास्त्रीय प्रकार म्हणून प्रसिध्दीस आलेला 'ठुमरी' हा गीतप्रकार असा हा भारतीय संगीताचा प्रवास अत्यंत रोचक असा आहे.

आज ख्यालगायनानंतर कलाकार पुरूष असो वा स्त्री, ठुमरी हे अवश्य गातात. बैठकीमध्ये 'ठुमरीला' मानाचे पान मिळालेले आहे. ठुमरीला हे इतके महत्वाचे स्थान कसे मिळाले हे पाहण्यासाठी थोडं इतिहासात डोकवावं लागेल.

तीन–चारशे वर्षांपूर्वी भारतीय संगीतात ध्रुपद गायन प्रचलित होते. त्यानंतर ध्रुपदाची जागा ख्यालाने घेतली. मनुष्याच्या बदलत्या भावना व विचारांच्या परिवर्तनामुळे ख्यालानंतर टप्पा, ठुमरी, दादरा, गजल, फिल्मिगीत इत्यादी प्रकार प्रचलित झाले. गायकीच्या या शैलींच्या विशेषतांमुळे या शैलींचे संगीतात आपले एक वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे. ख्यालाची मधुरता, भावयुक्त आलाप, ताना श्रोत्यांना आकर्षित करतात त्याचप्रमाणे ठुमरीतील भाव प्रधानतेने श्रोत्यांच्या हृदयात स्थान निर्माण केले.

ठुमरी गायन विशेषतः उत्तर प्रदेशातील अत्यंत सुमधुर तसेच श्रृंगारात्मक प्रकार आहे. शाब्दीक रूपाने ठुमरीची उत्पत्ती 'ठुम' वा 'ठुमकणे'या शब्दापासून झाली. ठु, म, री या तीन अक्षरांच्या मिलाफाने ठुमरी हा शब्द तयार झाला.

'ठुम' चा अर्थ – ठुमकत चालणे, श्रृंगारीक चाल
'री' चा अर्थ – एक अंतरंग सखीला आपल्या अंतर्मनातील गोष्ट सांगते आहे असा अर्थबोध होतो.

ठुमरी शब्द वस्तुतः कोणत्या काळात प्रचलित झाला हे सांगणे कठीण आहे. परंतु ठाकुर जयदेवसिंह यांच्या मतानुसार हा शब्द नृत्य आणि अभिनयाला व्यक्त करतो.

मध्ययुगात राजदरबारात ठुमरी गायन शैलीला खूप संरक्षण मिळाले. विशेषतः अवधचे नवाब वाजिद अली शाह यांच्या दरबारात लखनऊची सामाजिक, राजनैतिक व तत्कालीन स्थिती ठुमरीसारख्या गेय प्रकाराला अनुकुल होती. हयाचे मुख्य कारण असे होते की, हयात संगीताचे तीनही प्रकार गीत, वाद्य व नृत्याचा आनंद मिळत असे. नवाब वाजिद अली शाहांनी 'अख्तरपिया' या टोपण नावाने अनेक ठुम–या रचलेल्या आहेत.

ठुमरीचे सादरीकरण विशेष वर्गातील स्त्रिया (वेश्या) च्या मार्फत नृत्य, भाव अभियनासह केले जात असे. ठुमरी ही नृत्य व नाटयाव्दारे प्रस्तुत केल्या जात असल्यामुळे ती सामान्य जनतेला प्रभवित करीत असे. ह्यामध्ये नृत्याचार्य गीतामधील अर्थांना आपल्या भावप्रदर्शनाने प्रस्तुत करीत असे.

त्यामुळे ही गायकी लोकांना सहजगत्या समजत असे.

नवाब वाजिद अली शाह यांच्या काळात ठुमरी ही परमोच्च बिंदुवर होती. यांच्या दरबारात केवळ संगीतज्ञच नाही तर त्यांच्या बेगम आणि दरबारी सामंत हे देखील ठुमरीची रचना करण्यात व गाण्यास प्रवृत्त झाले होते.

ठुमरीचे दोन अंग आहेत.
1) पूर्वी अंग  2) पंजाबी अंग

लखनऊ आणि बनारसची ठुमरी पूर्वी अंगाच्या नावाने प्रसिध्द आहे. लखनऊची ठुमरी नवाबाच्या दरबारातील परिपोषित आहे. यामध्ये उर्दु आणि ब्रज मिश्रित भाषेचे प्राबल्य असते.

लखनऊ हे ठुमरी गायनाचे एकमात्र केंद्र वाजिद अली शाहच्या काळात समजले जात असे. या काळामध्ये लोकांच्या अभिरूचीमुळे ठुमरी गायन कलेचा विकास आणि प्रचार झाला. लखनऊच्या ठुमरी कलाकारांकडून ठुमरीचे शिक्षण घेण्याकरीता विभिन्न लोक येत असत. कालांतराने याला लखनवी शैली ही संज्ञा दिली गेली ज्याचे प्रतिष्ठापक सादिक अली खॉं, वाजिद अली शाह, कदरपिया, बिंदादीन महाराज हे मानले गेले.

लखनऊ ठुमरीचे देखील दोन प्रकार मानले गेले. पहिला म्हणजे गणिकाव्दारे आणि कथक नर्तकाव्दारे प्रयुक्त ज्यामध्ये भावाची अभिव्यक्ती नृत्यावर होत असे आणि गीताची भूमिका ही सहायक होती. आणि दुसरा प्रकार म्हणजे गायक–गायिकाव्दारा प्रयुक्त या गायनामध्ये नृत्य आणि अभिनय नसे. महाराज बिंदादीन, चॉंदपिया आणि बेगम आलमआरा यांच्या ठुमरी नृत्यप्रधान तर सादिक अली खॉं, वजिर मिर्जा, कदर पिया यांच्या ठमरी गायकी प्रधान असत.

गाण्याचा ढंग आणि भावाच्या आधारावर त्या काळीतल ठुम–यांचे देखील दोन भेद होते ज्यांना बोलबॉट आणि बोलबनावची ठुमरी म्हटल्या जात असे. या काळातील ठुमरी कलावंतांनी गायकी प्रधान ठुमरींच्या अंतर्गत बोलबॉटच्या ठुमरींमध्ये बोलांच्या विभिन्न लयकारी प्रयुक्त करणे आणि बोल–बनावच्या ठुमरींमध्ये गीत सन्निहित भावांना काकू च्या संयुक्त प्रयोगांनी अभिव्यक्त करण्याच्या प्रथेला प्रारंभ केला.

उत्तर भारतात लखनऊ व्यतिरिक्त बनारस हे ठुमरी गायकीसाठी प्रसिध्द होते. येथील ठुमरी गायन शैली इतकी लोकप्रिय झाली की याला 'बनारसी ठुमरी' म्हटले जाऊ लागले. बनारसी ठुमरी शैलीचा विकास विसाव्या शतकाच्या सुरवातीसच होऊ लागला.

बनारसमधील कलावंत संगीत प्रदर्शनाबरोबरच गणिकांना नृत्य आणि गायन शिकवित असत. यामध्ये कालिका प्रसाद, भैया गणपतराव, जगदीप मिश्र, मौजुद्दीन खॉं व त्यांच्या शिष्यांनी बनारस ठुमरी गायनाचा प्रचार केला आणि या सर्वांच्याच योगदानामुळे बनारस शैली ठुमरीच्या विकासाची
सुरूवात झाली.

बनारस ठुमरीच्या रचनांवर उत्तर भारतातील पूर्वी प्रदेशातील बोली भाषा, लोकगीत आणि लोकधुनांचा प्रभाव दिसून येतो. बोलबनाव आणि गानप्रधान असे बनारस ठुमरीचे स्वरूप आहे. विसाव्या शतकाच्या सुरवातील पूरबी किंवा पुर्वी ठुमरीच्या दोन शाखा बनारसी आणि लखनवी हया होत्या. परंतु बनारसी ठुमरीचे महत्त्व इतक वाढले की ती पूर्वी अंगाची एकमात्र प्रतिनिधी समजली गेली आणि लखनवी ठुमरीचे केवळ नावच शिल्लक राहिले.

**पंजाब अंग :–**

ठुमरीची दुसरी शैली 'पंजाब अंग' या नावाने प्रसिध्द आहे. याची उत्पत्ती पंजाबी लोकगीतांपासून मानली जाते. या शैलीचे प्रणेता पंजाबचे स्व. उस्ताद बडे गुलाम अली खॉं आणि त्यांचे छोटे भाऊ उस्ताद बरकत अली खॉं हे मानले जातात.

ठुमरी गायन शैलीला एकेकाळी निषिध्द समजले जात असे. परंतु ठुमरीतील भवपूर्ण काव्य, गायन शैलीत थेट रसिकांच्या हृदयाचा ठाव घेतला आणि ती रसिक श्रोत्यांच्या मनावर विराजमान झाली. आज हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतामध्ये ठुमरीचे एवढे आकर्षण वाढले आहे की संगीत संम्मेलन, कार्यक्रममध्ये गायक–वादक कलाकार ठुमरीचे प्रस्तुतीकरण हे अवश्य करतात.

ठुमरी गायकीमध्ये इतर गायनशैलींच्या तुलनेत भावना व्यक्त करण्याची अपरिमित शक्यता आहे. यामध्ये तान व आलाप यांचा उपयोग करत नाहीत. ठुमरी हा असा गीत प्रकार आहे, ज्यामध्ये शुध्दतेपेक्षा भाव सुंदरता यावर अधिक भर दिला जातो. गायकीमध्ये मींड व कण यांचा अधिक प्रयोग होतो. ह्यामध्ये गळयाची तयारी व भावपूर्ण बोलांचे अधिक महत्त्व आहे. ठुमरी विशेषतः चपल रागांमध्ये गायली जाते. यामध्ये शृंगाररस व चंचलता अधिक झळकते.

ठुमरी गायकीमध्ये रागांचे मिश्रण होऊ शकते व ही गायकी संपूर्णतया शास्त्रीय नियमांचे उल्लंघन करते. ठुमरी चंचलतायुक्त गायकी आहे. ठुमरी आपला कलापक्ष व भावपक्ष यामुळे जनमानसात लोकप्रिय झाली. अशा व्यक्ती, ज्यांना संगीताचे ज्ञानदेखील नव्हते, ते देखील मधुर ठुमरी ऐकून मंत्रमुग्ध होतात. ठुमरी गायनात गायकाजवळ आपली विलक्षण मर्मज्ञता व आपले भाव व्यक्त करण्याची अफाट क्षमता असते. या संदभात आपण असे म्हणू शकतो की, ठुमरीमध्ये भावांचे सूक्ष्म अंतर दाखविण्याची, तसेच प्रत्येक क्षणाला बदलणा—या सौंदर्याची मानसिकता यांचे कोमलतेने प्रकटीकरण करण्याची अधिक क्षमता असते.

ठुमरीमध्ये शब्दरचनेला प्राधान्य असते व त्याची शब्दरचना अतिशय मधुर असते. यामध्ये रागाच्या शुध्दतेच्या जागी भावाभिव्यक्तीचे प्रमुख स्थान असते. भावाभिव्यक्ती याचे मुख्य ध्येय असल्याने हयामध्ये आनंद, दुःख, प्रेम इत्यादी भावना सहजरित्या व्यक्त केल्या जातात.

वर्तमान काळामध्ये ठुमरीचे स्थान भावात्मक आणि लोकप्रिय गायन शैलीचे आहे. आज ठुमरी उत्सव, पावस संगीत सभा यासारख्या अनेक कार्यक्रमाचें आयोजन केले जात आहे. ठुमरीच्या प्रचार
आणि प्रसाराचे आयोजन केले जात आहे. ठुमरीच्या प्रचार आणि प्रसारामध्ये आकाशवाणी आणि दुरदर्शन यांची प्रमुख भूमिका आहे. आकाशवाणीला विभिन्न कलाकारांच्या ठुमरी गायनाचे कार्यक्रम सादर केले जातात. दुरदर्शनवर देखील ठुमरी गायनाचे कार्यक्रम सादर केले जात असल्यामुळे ठुमरी गायनशैली सर्वसाधारण जनतेच्या परिचयाची झाली.

ठुमरीच्या संपूर्ण इतिहासाचे अवलोकन केल्यावर हे तथ्य दिसून येते की अभिनयात्मक नृत्य गीतांची गानशैली असून देखील ठुमरी गायन शैली लोकपरंपरेच्या माध्यमातून वर्तमान काळापर्यंत पोहोचली व शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत मानाचे स्थान देखील मिळवले.

## संदर्भग्रंथ :—


| | ग्रंथ | लेखक | प्रकाशक |
|---|---|---|---|
| 1. | निबंध संगीत | संकलक डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग | संगीत कार्यालय हाथरस, उ. प्र. |
| 2. | संगीत निबंधावली | संकलक डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग | संगीत कार्यालय हाथरस, उत्तर प्रदेश |
| 3. | सफर ठुमरी गायकी का | अंजली पोहनकर | कनिष्क पब्लिशर्स, नई दिल्ली |
| 4. | ठुमरी एवं महिला कलाकार | पुर्णिमा व्दिवेदी | अनुभव पब्लिशिंग हाऊस, इलाहाबाद |
| 5. | मासिक संगीत कला विहार | अंक—जुन 2010 | |


LBP PUBLICATION